महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १७० वा | दिनांक : ०८/०४/२०२५ | वार : मंगळवार

## शक्तीपीठातून ५० हजार कोटी हाणण्याचा डाव : राजू शेट्टी



**कोल्हापूर :** राज्य सरकारच्या नियोजित शक्तिपीठ महामार्गाला कोल्हापूर सांगलीसह १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा विरोध आहे. शक्तीपीठ महामार्गातून किमान ५० हजार कोटी हाणायचा तुमचा डाव आहे, असा आरोप स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी केला आहे. जेव्हा तुमची सत्ता जाईल तेव्हा ही जनता तुम्हाला भर चौकात पायाखाली तुडवायला मागे पुढे बघणार नाही, असेही राजू शेट्टी म्हणाले.

शक्तिपीठ महामार्गाला १२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा विरोध आहे. असे असतानाही सरकारकडून हा प्रकल्प रेटला जात आहे. त्यामुळे शेतकरी आक्रमक झाला असून कोल्हापूरमध्ये सुद्धा अत्यंत आक्रमक पद्धतीने शक्तिपीठला विरोध होत आहे. दोन दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोल्हापूर दौऱ्यावर आले होते, यावर विरोधकांनी शक्तिपीठ आंदोलनाद्वारे त्यांच्याविरोधात आवाज उठवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्यापूर्वीच आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांची धरपकड करत विरोध मोडून काढला. या आंदोलनात गिरीश फोंडे यांचाही समावेश होता, जे शक्तिपीठ आंदोलनाशी संबंधित आहेत. गिरीश फोंडे हे मनपा शिक्षक असल्याने त्यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यांचे निलंबन झाल्यामुळे शेतकरी आंदोलक आणखी आक्रमक झाले आहेत. यावरून राजू शेट्टी यांनी सरकारवर संताप व्यक्त केला.

कॉम्रेड गिरीश फोंडे यांच्यासारख्या चळवळीतील कार्यकर्त्याला सरकारच्या विरोधात बोलले म्हणून राजकीय दबावापोटी टक्केवारीच्या तुकड्यांवर जगलेल्या महापालिका अधिकाऱ्यांनी सहाय्यक शिक्षक पदावरून तडकाफडकी निलंबित केले. यावरून राज्याच्या राजकारणाची पातळी किती खालच्या दर्जाला गेली आहे हे सामान्य जनतेच्या लक्षात येऊ लागले आहे. राज्यातील राज्यकर्ते षंड झाले आहेत हे सिद्ध झाले आहे, असा हल्लाबोल शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी केला.

यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात राज्यकर्ते अशा पद्धतीने चळवळी संपवण्यासाठीच काम कितीही जोमाने केले तरी त्याच जोमाने आम्ही लढत राहू. मात्र, राज्यकर्त्यांनी लक्षात ठेवावे सत्तेच्या जीवावर अतिरेक करून तुम्ही ज्या भानगडी व कारनामे करत आहात हे जनतेला माहिती आहे. शक्तिपीठ महामार्गातून किमान ५० हजार कोटी हाणायचा तुमचा डाव आहे. जेव्हा तुमची सत्ता जाईल तेव्हा ही जनता तुम्हाला भर चौकात पायाखाली तुडवायला मागे पुढे बघणार नाही, असा इशाराही राजू शेट्टी यांनी दिला.

दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा विरोध असला तर शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात महायुतीला भरघोस यश मिळाले. एकनाथ शिंदेंच्या भूमिकेमुळे महायुतीचे सर्व आमदार निवडून आले. परंतु सत्तेवर आल्यानंतर महायुती सरकारचे शक्तिपीठबाबत धोरण बदलले असून, कोणत्याही परिस्थितीत शक्तिपीठ प्रकल्प राबवण्याचा निर्धार व्यक्त केला जात आहे. त्यामुळे कोल्हापूरमध्ये शेतकऱ्यांकडून अत्यंत आक्रमक पद्धतीने शक्तिपीठला विरोध होत आहे.

## अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरण : हायकोर्टाचा राज्य सरकारला दणका



**मुंबई :** बदलापूर प्रकरणातील अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरणी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दणका दिला आहे. या प्रकरणी संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करा, असे आदेश मुंबई हायकोर्टाने दिलेत. अक्षय शिंदेच्या वडिलांनी पोलिसांवर आरोप करत याचिका दाखल केली होती. त्यावर हायकोर्टाने निकाल देताना हे आदेश दिले आहेत.

अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरणी मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. या सुनावणीत आज मुंबई हायकोर्टाने आदेश जारी केले आहेत.मुंबई गुन्हे शाखेचे लखमी गौतम यांच्या नेतृत्वात हा तपास केला जाणार आहे.

अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणातील ज्या पोलिसांवर आरोप होते, त्या पोलिस अधिकाऱ्यांवर मॅजिस्ट्रेट कोर्टाने एक अहवाल तयार केला होता. त्यात पोलिसांवर ठपका ठेवण्यात आला होता. राज्य सरकारने त्यातील एका विशिष्ट भागाला आव्हान दिले होते. मात्र, ते सुद्धा फेटाळून लावण्यात आले आहे. या प्रकरणातील पाच पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि गोखले यांच्या खंडपीठाने हे आदेश जारी केले आहेत.

मुंबई पोलिस सहआयुक्त गुन्हे यांना या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी पोलिसांवर कारवाईची मागणी करत याचिका दाखल केली होती. या घटनेबाबत दंडाधिकारी कोर्टाने पोलिसांच्या कारवाईवर ठपका ठेवला होता. यावर विरोधकांनीही राज्य सरकारवर टीकेची झोड उडवली होती.

या प्रकरणावर आता राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कोर्टाने आधीच याबद्दल सांगितले होते. पोलिसांनी कायदा हातात घेतला आहे. आमच्या सारख्या लोक प्रतिनिधींनी देखील हेच सांगितले होते. हे सगळे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करत होते. मी माननीय उच्च न्यायालय मुंबई यांचे मनापासून आभार मानतो, असे आव्हाड म्हणाले आहेत.

पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, कायद्याचे राज्य स्थापित करण्यासाठी निर्माण झालेल्या लोकशाहीमध्ये कायदा हातात घेण्यासाठी काम केले जाते, हे दुर्दैवी आहे आणि हे लोकशाहीला घातक आहे.

## स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा मुंबई हायकोर्टात

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबन गाण्याप्रकरणी अडचणीत सापडलेला स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी आता मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेद्वारे त्यांनी मुंबई पोलिसांनी नोंदवलेला एफआयआर रद्द करण्याची मागणी केली आहे.

कामरा यांनी ५ एप्रिल रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यात त्यांनी असा दावा केला आहे, त्यांच्याविरुद्ध नोंदवलेला एफआयआर हा संविधानाने दिलेल्या त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. या प्रकरणाची सुनावणी २१ एप्रिल रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती एस.व्ही. कोतवाल आणि न्यायमूर्ती एस.एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर होईल.

दरम्यान, तिकीट बुकिंग प्लॅटफॉर्म BookMyShow ने शनिवारी त्यांच्या वेबसाइटवरील कलाकारांच्या यादीतून कुणाल कामराचे नाव काढून टाकले. तसेच, कामराशी संबंधित सर्व सामग्रीही वेबसाइटवरून काढून टाकण्यात आली.

कामरा यांनी आपल्या शोमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देशद्रोही म्हटले होते. यानंतर शिवसेना नेते राहुल कनाल यांनी ३ एप्रिल रोजी बुकमायशोला पत्र लिहून त्यांच्या शोची तिकिटे विकू नयेत अशी मागणी केली होती.

दुसरीकडे कुणाल कामरा तिसऱ्यांदा समन्स बजावूनही मुंबई पोलिसांसमोर हजर झाला नाही. गत २ एप्रिल रोजी त्याला तिसरा समन्स पाठवण्यात आला होता. त्यात त्याला ५ एप्रिल रोजी हजर राहण्यास सांगण्यात आले होते.

कुणाल कामरा विरोधात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबन गाण्याविषयी मुंबईतील खार पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करण्यात आला आहे. कामराने एका स्टँड-अप कॉमेडी शोमध्ये एक विडंबन सादर केले होते, त्यात त्यांनी शिंदे यांचा उल्लेख देशद्रोही असा केला होता.

याआधी ३१ मार्च रोजी मुंबई पोलिस कॉमेडियन कुणाल कामराच्या घरी पोहोचले होते. यावर कामराने सोशल मीडियावर लिहिले होते - 'तुम्ही अशा पत्त्यावर जात आहात जिथे मी गेल्या दहा वर्षांपासून राहत नाही. हा तुमचा वेळ आणि सार्वजनिक संसाधनांचा अपव्यय आहे.

कुणाल कामरा १ एप्रिल रोजी मद्रास उच्च न्यायालयात हजर झाला. त्याने असा दावा केला होता की, पोलिस त्याला अटक करण्याचा प्रयत्न करत आहेत, म्हणून त्याला ट्रान्झिट ॲन्टिसिपेटरी जामीन मंजूर करावा. या खटल्याची सुनावणी करताना न्यायमूर्ती सुंदर मोहन यांनी कामरा यांना संक्रमण अटकपूर्व जामीन मंजूर केला. यानंतर, त्याने X वर एक पोस्ट शेअर केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ एप्रिल २०२५


## सात एप्रिल पासून अंजना स्कूल ऑफ एक्सीलंस शाळेत मोफत जे.ई.ई., नीट, एम.एच.सीईटी.चे डेमो वर्ग

**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** अंजना अकॅडमी कडून JEE / NEET / MHT CET साठी मोफत डेमो क्लासेस दिनांक ७ एप्रिल २०२५ पासून २२ एप्रिल २०२५ पर्यंत आयोजित करण्यात येत आहेत.याची वेळ सकाळी ८:०० ते दुपारी १२:००वाजेपर्यंत असून या संधीचा अधिकाधिक लाभ घ्यावा या वर्गामध्ये विद्यार्थीच्या करिअर डेव्हलपमेंटसंदर्भात मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी ही सुवर्णसंधी गमावू नये आणि शहरातील सर्वोत्तम फॅकल्टीकडून आपल्या भविष्यासाठी योग्य दिशा मिळवावी व यशस्वी व्हावे असे संस्थेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. बस सुविधा पुढील ठिकाणांहून उपलब्ध आहेअसेगाव, करोडी, माळीवाडा, खुलताबाद, दौलताबाद, पडेगाव, कसाबखेडा, गाजगाव, लासूर, टाकळी, अंबेगाव, पाचपीरवाडी, शाहपूरबांजर, फतियाबाद, खिर्डी, मौसळा, मिटमिटा, अंबेलोहळ, एकलहरे, पिंपळगाव, जांभळा, गोकुळवाडी. या ठिकाणाहून बस व्यवस्था करण्यात आलेली आहे.तर बाहेर गावाहून येणाऱ्या विध्यार्थ्यांसाठी डेमो क्लासेससाठी मोफत वसतिगृहाची सुविधा उपलब्ध केलेली आहे. याचे ठिकाण:अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स, गट क्र. ६, तळेसमान, फतियाबाद, आसेगाव रोड, ता. गंगापूर, जि. छ. संभाजीनगर येथे होणार आहे. ४३१००२ विध्यार्थी यांनी संपर्क: ७७५८८४९९९७ / ८८८८८६०९५५ / ७७२१९९४७७७ असुविधा झाल्यास उपरोक्त संपर्क नंबर वर संपर्क करावा असेही आवाहन आसेगाव स्कूल ऑफ एक्सलन्स शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

## साई मंदिर तिसरे वर्धपान दिन साजरा



**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** : दरवर्षी प्रमाणे दौलताबाद येथील येथील साई मंदिर येथे तिसरे भव्य वर्धपान दिन साजरे करण्यात आलेसंत गोरोबा भजनी मंडळ यांच्या वतीने साई भजने गाण्यात आली दुपारी मंदिरात आरती घेऊन कार्यक्रमाचे सांगता करण्यात आलीयानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमा साठी पंचक्रोशीतील साई भक्त भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होतेयावेळी माजी पंचायत सभापती सर्जेराव चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य विजय जाधव, माजी सरपंच संजय कांजुणे, सय्यद हारून, आयोजक रामदास इंगळे, देविदास इंगळे, विलास इंगळे, ग्रा प सदस्य दीपक घुसळे, किशोर जाधव,योगेश पाढळे, शंकर जाधव, इतिहास संशोधक प्रा शिवाजी गायकवाड, विश्वभर आनंदे, देशपांडे काका, शेख मुकतार, कल्याण कांजुने, गणेश जाधव, विषवनाथ ढगारे, राजू खडागळे, गणेश इंगळे, आदी बरोबर महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने शिक्षकांच्या नियमबाह्य बेकायदेशीर परीक्षेचा घातला घाट !



मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळात दिनांक १२ मार्च २०२५ रोजी संस्थेअंतर्गत अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या अनुभवी शिक्षकांची १०० गुणांची परीक्षा आयोजित केली असून ही परीक्षा म्हणजेच शिक्षकांचा करण्यात येणारा अवमान असून होत असलेली ही परीक्षा शिक्षकांच्या व्यावसायिक प्रतिष्ठेच्या विरोधात आहे तसेच हा कायद्याचा आणि नियमाचा भंग आहे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातील अनेक शिक्षक कर्मचाऱ्यांनी याला विरोध केला आहे हा अपमान शिक्षक कर्मचारी कदापिही सहन करणार नाही तरी या परीक्षा मंडळाने न घेता शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्था अंतर्गत प्रशिक्षणाचे आयोजन करावे जेणेकरून शिक्षकांच्या गुणवत्तेमध्ये निश्चितच वाढ होईल. परंतु मंडळाने नियमबाह्य बेकायदेशीर या परीक्षेचे आयोजन करून शिक्षकांना मानसिक त्रास व शिक्षकांच्या आत्मसन्मानावर आघात करण्याचे कार्य केलेले आहे तरी या परीक्षा तात्काळ रद्द करण्यात याव्यात अन्यथा लोकशाही मार्गाने आपल्या संस्थेच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगर चे (जिल्हा सचिव) भाई चंद्रकांत चव्हाण यांनी दिलेले आहे यांच्या नेतृत्वाखाली आज संस्था कार्यालयात संस्था पदाधिकारी श्री त्रिंबकभाऊ पार्थिकर व प्रशासकीय अधिकारी श्री एफ. एम. माळी सर यांना निवेदन देण्यात आले. या वेळी यावेळी संघटनेचे पदाधिकारी योगेश खोसरे विनोद केणेकर, अशोक ढमढेरे, विलास चव्हाण, दीपक वाघ, बाळू पवार, संतोष सुरडकर, नवनाथ मंत्री अजय कदम, विलास चांदणे, पद्माकर पगार, शितल कडवे, अरुणा चौधरी, सविता हिंगे, मानसी भागवत उपस्थित होते.

## घरातील एकुलत्या एक कमावत्या मुलाचा दुर्दैवी अंत

**रत्नागिरी :** रत्नागिरीत एक दुर्दैवी घटना घडली आहे. आंबे काढताना एका तीस वर्षीय युवकाचा शॉक लागून दुर्दैवी अंत झाला आहे. झाडवरून आंबे काढत असताना त्याचा विद्युत तारेला स्पर्श झाला व त्याला जोराचा शॉक लागला. महेश राजू इलम असे या युवकाचे नाव होते. इलम कुटुंबातील कमावणारा महेश हा एकुलता एक मुलगा होता. महेशच्या या दुर्दैवी मृत्युमुळे इलम कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळल आहे.

महेश इलम हा खेड तालुक्यातील पोसरे येथे राहत होता. ऊस तोडणीच्या कामासाठी महेश पश्चिम महाराष्ट्रात व आंबा हंगामामध्ये कोकणात आंबे काढण्याचे काम करत असे. शनिवारी सकाळी 8.45 च्या सुमारास महेश राजू इलम हा रत्नागिरी शहरातील चंपक मैदान येथे आंबे तोडण्यासाठी गेला होता. यावेळी ही घटना घडली आहे. महेश हा अनिल नार्वेकर यांच्याकडे कामाला होता. महेशच्या हातातील घळाचा स्पर्श आंब्याच्या झाडाशेजारून जाणाऱ्या विद्युत तारेला झाला. त्यामुळे महेशला जोराचा शॉक लागला व थरथरायला लागला. ही बाब इतरांच्या लक्षात येताच महेशला खाली उतरवले व तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी महेशला तपासून मृत घोषित केले. या प्रकरणाची रत्नागिरी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

महेशच्या मृत्यूने इलम कुटुंबावर दु:खाचे मोठे डोंगर कोसळले आहे. आपला उदरनिर्वाह चालवण्यासाठी महेश मजुरी करायचा. इलम कुटुंबातील महेश हा एकुलता एक कमावणारा व्यक्ती होता. महेशच्या पश्चात आई-वडील पत्नी व तीन मुळे असा परिवार आहे. महेशच्या मृत्यूमुळे कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. हातावर पोट असलेल्या या कुटुंबाला शासकीय मदत मिळावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## सोबत फिरायला गेल्यावर ठेवला लग्नाचा प्रस्ताव

**अकोला :** महाराष्ट्रात महिला व मुलींवरील अत्याचार त्याचसोबत हत्येच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. अशीच एक घटना अकोला शहरात घडली आहे. मुलीने लग्नाला नकार दिल्याने चाकू हल्ला करत तिचा खून करण्याचा प्रयत्न केला आहे. या घटनेने अकोला शहर हादरले आहे. या हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर आरोपी तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे.

संतोष डिवरे असे चाकू हल्ला करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. तर तरुणी ही वैद्यकीय नर्स असल्याचे समजते. आकोल्यातील बोरगाव मंजू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सोनाळा रस्त्यावर ही घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष डिवरे आणि जखमी तरुणी हे दोघे चांगले मित्र आहेत. दोघेही बोरगाव मंजू परिसरात फिरायला गेले होते. फिरायला गेले असताना संतोषने तरुणीसमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला. मात्र तरुणीने स्पष्ट नकार दिल्याने दोघांमध्ये वाद झाला आणि हा वाद विकोपाला गेला. संतोषने वादादरम्यान त्याच्या जवळील चाकूने तरुणीवर वार केले. या घटनेत तरुणी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सद्यस्थितीत तरुणीची प्रकृती स्थिर आहे. या घटनेने मात्र अकोल्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या या घटनेचा अधिक तपास बोरगाव मंजू पोलीस स्टेशन करत असल्याची माहिती ठाणेदार अनिल गोपाळ यांनी दिली आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ एप्रिल २०२५


## सव्वा क्विंटल जिलेबी वाटून मुलीचे स्वागत



**आमठाणा :** कुटुंबात मुलगी जन्माला आल्याने कुटुंबीयांनी गावभर सव्वा क्विंटल जिलेबी वाटून आनंद साजरा केला आहे. सिल्लोड तालुक्यातील धामणी येथील वाघ परिवाराने राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

मुलीच्या जन्माचे स्वागत म्हणून मुलगी ही कर्तृत्वाचं रूप असते, तिचा जन्म हा घरातील सर्वांसाठी आशादायी आणि आनंदमय असतो. 'तीच दिन कुळाचा उद्धार करते', अशी भावना प्रभाकर दगडू वाघ यांनी आपल्या नातीच्या जन्माचा आनंद साजरा करताना व्यक्त केली. धामणी येथील वाघ परिवाराच्या तिसऱ्या पिढीत आता मुलगी जन्माला आल्याने संपूर्ण कुटुंबाच्या चेहऱ्यावर आनंद पसरला आहे. तीन पिढ्यांपासून त्यांना लेकीच्या जन्माची प्रतीक्षा होती. जिल्हाधिकारी स्वामी यांच्या "मुलीचा जन्मदर वाढवा, स्त्रियांचा सन्मान करा' या आवाहनाला अनुसरून या कुटुंबाने भराडी येथील ज्ञानविकास शाळेच्या आवारात 1300 विद्यार्थ्यांना, शिक्षिका शिक्षकांना तसेच ग्रामस्थांना सव्वा क्विंटल जिलेबी वाटून कन्याप्राप्तीचा आनंद साजरा केला. "आमच्या घरात तीन पिढ्यांमध्ये आजपर्यंत मुलगी नव्हती, पण आता आम्हाला वाघीण मिळाली' आहे, अशी आनंदाची भावना प्रभाकर वाघ यांनी व्यक्त केली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनीही वाघ परिवाराचे कौतुक केले आहे. फोनवरून साधलेल्या संवादात ते म्हणाले की, "बेटी बचाओ, बेटी पढाओ' या मोहिमेअंतर्गत जिल्हाभर मुलींचा सन्मान होत आहे. वाघ परिवाराने मुलीच्या जन्माला जिलेबी वाटून जो आनंद साजरा केला, तो इतरांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण आहे. नवजात मुलीच्या आजी दीपमाला वाघ या स्वतः आशा कार्यकर्ती आहेत. त्यांनी म्हटले की, "मी आशा वर्कर म्हणून घरोघरी जाऊन मुलींच्या गर्भपाताविरुद्ध जनजागृती करते. मुलींचा जन्मदर वाढवणे, त्यांना पोषक आहार देणे हे आमचे कर्तव्य आहे. आज माझ्या सुनेला मुलगी झाली, तेव्हा माझ्या कामाची खरी पावती मिळाली.

## महाराष्ट्रावर सुर्याचा प्रकोप




**नागपूर :** महाराष्ट्रात सूर्य आग ओकू लागला असून तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. गेल्या आठवड्यात दोन दिवस आलेल्या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र आता तापमानाचा पारा चढाच राहणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. अकोल्यात गेल्या दोन दिवसांपासून 43 अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले होते, मात्र आज हेच 43.2 वर गेल्याचे पाहायला मिळाले.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारपासून राज्यातील अनेक भागांमध्ये तापमानात वाढ होणार असून अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर महाराष्ट्रासह विदर्भातही उष्णतेच्या तीव्र लाटा सुरू राहणार असल्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. नागपूर महापालिकेने देखील उष्णतेची तीव्रता लक्षात घेता अलर्ट जारी केला आहे. उष्माघातापासून वाचण्यासाठी नागपूर महापालिकेने हीट ॲक्शन प्लॅन तयार केला आसून शाळांच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत. तसेच बेघरांना शेल्टर हाऊस आणि इतर हॉटस्पॉट भागांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार सध्या बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय आहे, त्यामुळे दक्षिण भारतातील काही राज्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, महाराष्ट्रावरून आलेले अवकाळी वादळ आता पुन्हा दक्षिणेकडे सरकले असून, उत्तरेकडे नव्याने एक पश्चिमी विक्षोभ तयार होत आहे. यामुळे येत्या तीन ते चार दिवसांत हिमालयाच्या पायथ्याशी असणाऱ्या राज्यांमध्ये जोरदार पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दक्षिण आणि उत्तर भारतात अवकाळी पावसाचा धोका असताना, महाराष्ट्रात मात्र उष्णतेची तीव्रता वाढणार असल्याचे स्पष्ट संकेत हवामान विभागाने दिले आहेत. येत्या दोन दिवसांत महाराष्ट्रातील अनेक भागांत कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या अनेक ठिकाणी तापमान चाळिशीच्या पुढे गेले आहे आणि अशा परिस्थितीत वाढत्या उष्णतेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन तज्ञांकडून करण्यात येत आहे.

अकोला 44.2 , अमरावती 43.6, यवतमाळ 42, वर्धा 42, नागपूर 42.4, चंद्रपूर 43.6, गोंदिया 40.6. तर जळगाव आणि नंदुरबार या दोन्ही जिल्ह्यात 42.8 अंश सेल्सिअस अशी नोंद करण्यात आली आहे. मराठवाड्यात आज सर्वाधिक तापमान परभणीत नोंदवले गेले. 40.7 तापमानाची नोंद आज परभणीत झाली आहे. छत्रपती संभाजी नगर 40.2 अंशावर आहे. लातूर धाराशिव मध्ये 39.2 अंश सेल्सिअस तापमान आहे. पुण्यात आज 39.2 अंश सेल्सिअस तापमान होते .तर सोलापुरात 41.4 .नाशिक 40.2 सांगली कोल्हापूर सातारा 38 ते 38.5 अंश ठाणे पालघर 37 व 36 अंश सेल्सिअस वर होते.

## तनिषा भिसेच्या मृत्यूप्रकरणी दीनानाथ रुग्णालयावर कारवाईची करा - खासदार सुप्रिया सुळे



**पुणे :** दीनानाथ रुग्णालयात तनिषा भिसे यांचा मृत्यू होण्याची घटना अतिशय असंवेदनशील आहे. भिसे यांच्या मृत्यूप्रकरणी रुग्णालयाला जबाबदार धरून कारवाई करावी अशी मागणी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. महानगर पालिकेवर संताप व्यक्त करत रुग्णालयाने थकवलेला २७ कोटींचा कर का वसूल करण्यात आला नाही ? असा सवाल देखील सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला.

पुणे महागर पालिकेत मतदार संघातील विविध विकसकामांचा आढावा खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी घेतला. यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेत दीनानाथ रुग्णालयात घडलेल्या घटनेप्रकरणी संताप व्यक्त केला. सुप्रिया सुळे म्हणाल्या, भारताल लोकं खूप विश्वासाने आरोग्य सेवेचा लाभ घेण्यासाठी रुग्णालयात जात असतात. आपल्याकडे डॉक्टरांना देव मानतात. कोरोना काळात सर्वांनी याचा अनुभव घेतला आहे. एका हॉस्पिटलमुळे संपूर्ण आरोग्य यंत्रणा ही वाईट ठरत नाही. मात्र, तनिषा यांच्या मृत्यूला दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलच जबाबदार आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्यूची जबाबदारी ही दवाखान्याला घ्यावीच लागले. तसेच सरकारने देखील दवाखान्याला दोषी ठरवून कारवाई करायला हवी. शरद पवार मुख्यमंत्री असताना व श्रीनिवास पाटील कलेक्टर असताना रुग्णालयाल ही जागा दिली गेली. या साठी लता दीदींनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे रुग्णालयाल ही जमीन देण्यात आली. त्यामुळे हा दवाखाना उभा राहिला. मात्र, या रुग्णालयात गेलेल्या अनेक नागरिकांनी दवाखान्यात येणाऱ्या वागणुकीबद्दल तक्रारी केल्या होत्या. धर्मादाय दवाखाना असल्यामुळे सगळ्यांनी मदतीची भुमिका घेतली. मात्र. घडलेली घटना दुर्देवी आहे. या दवाखान्याला मंगेशकर कुटुंबियांचे मोठे नाव आहे. मात्र, या प्रकरणात मंगेशकर कुटुंबाची काही चुक नाही, कारण ते त्या हॉस्पिटलच्या प्रशासनात नसून ते केवळ ट्रस्टी आहेत. त्यामुळे आपण त्यांनाही ही घटना गंभीरतेने घेऊन या प्रकरणी कारवाई करण्याची विनंती करू. दीनानाथ मंगेशकरांचं यांच नाव असलेल्या या दवाखान्यात घडलेली ही घटना धक्कादायक आहे, मंगेशकर कुटुंबाचं या देशात मोठं योगदान आह, असे सुळे म्हणाल्या.

## मैत्रिणीला गुंगीचे औषध देऊन दागिने चोरणारी तरुणी अटकेत

स्वत:च्या मैत्रिणीला जाणीवपूर्वक कॉफीतून गुंगीचे औषध देऊन तिला बेशुध्द करुन तिच्या घरातील कपाटातील सोन्याचे दागिने चोरी करुन पसार झालेल्या आरोपी तरुणीला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी आरोपी तरुणीकडून साडेपाच लाख रुपयांचे दागिने जप्त केले आहे. याप्रकरणी एका २५ वर्षीय आरोपी तरुणीला अटक करुन तिच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आरोपी तरुणीच्या मैत्रिणीने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात दोषी मैत्रिणी विरोधात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणी आणि आरोपी तरुणी या एकमेकींच्या चांगल्या मैत्रिणी आहेत. ६ मार्च रोजी आरोपी तरुणी मैत्रिणीच्या घरी सहज गेली होती. त्यावेळी तिने मैत्रिणीला स्वत: कॉफी करुन दिली आणि तिच्या नकळत कॉफीत जाणीवपूर्वक गुंगीचे औषध मिसळले. मैत्रीण बेशुद्ध पडल्याने तिने बेडरुम मधील कपाटातील साडेपाच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरुन ती पसार झाली.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ एप्रिल २०२५

# ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस सेंटरचा लोकार्पण सोहळा



**मुरूम, (डॉ. महेश मोटे) :** येथील ग्रामीण रुग्णालयात सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून डायलिसिस सेंटरचे ऑनलाइन चित्रफितीद्वारे लोकार्पण सोहळा सोमवारी (ता.७) रोजी संपन्न झाला. ग्रामीण रुग्णालयात नव्याने अद्यावत डायलिसिस सेंटरचे फीत कापून उद्घाटन उमरगा-लोहारा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपचे नेते श्रीकांत मिनियार, बळीमामा सुरवसे, बसवराज वरनाळे, चंद्रशेखर मुदकन्ना, मुख्याधिकारी सचिन भुजबळ, वैद्यकीय अधिकारी सत्यजित डुकरे, अजित चौधरी, भगत माळी, राजेंद्र शिंदे, अमृत वरनाळे, रोटरीचे अध्यक्ष कमलाकर मोटे, सचिव सुनिल राठोड, डॉ. महेश स्वामी, संतोष कांबळे, जगदीश निबरगे, राजू मुल्ला, राहुल वाघ आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्ञानराज चौगुले म्हणाले की, डायलिसिस एक वैद्यकीय प्रक्रिया असून जी मूत्रपिंड कार्यक्षम नसताना रुग्णांच्या शरीरातून अपायकारक द्रव्ये, टाकाऊ उत्पादने व अतिरिक्त पाणी काढून टाकण्याकरिता वापरले जाते. ही अद्यावत यंत्रणा या परिसरातील गोरगरीब जनतेसाठी शासनाच्या वतीने मोफत सुरू करण्यात आली आहे. याचा जास्तीत-जास्त परिसरातील रुग्णांनी लाभ घ्यावा असे आव्हान यावेळी त्यांनी केले. श्रीकांत मिनीयार मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, ही योजना निश्चितच या परिसरातील रुग्णांना फायदेशीर असून अशी योजना सुरू करणे म्हणजे खऱ्या अर्थाने रुग्णांना जीवनदान देणे होय. यामुळे शासन व आरोग्य विभागाचे त्यांनी यावेळी आभार व्यक्त केले. डॉ. सिफाना तांबोळी, डायलिसिस तंत्रज्ञ सागर देशमुख, सुकलेश कांबळे, अश्विनी कपुरे, आकाश कवाळे, रवी भालेराव, सचिन तेगाडे, सुजित जाधव आदींनी परिश्रम घेतले. सदर सेंटर स्वतंत्र व अद्यावत वातानुकूलित, स्वतंत्र ४ बेड, टर्मिनल मर्जन्सी, सीपीआर इक्विपमेंट, पेरीटीनियम मशीन, वॉटर प्युरिफिकेशन यंत्रणा, डायलायझर व्यवस्था, बीपी मॉनिटर, ईसीजी मॉनिटर, ऑक्सिजन सॅच्युरेशन, हार्ट रेट, आरोग्य सेवा कर्मचारी व प्रशिक्षित तंत्रज्ञ, नर्सेस, सॉफ्टवेअर मशीन, मॉनिटरिंग व्यवस्था व औषधोपचार आदींची यंत्रणा सज्ज करण्यात आल्याची माहिती या विभागाकडून सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश अर्दाले यांनी केले. सूत्रसंचालन विजय भोसले तर डॉ. दिनेश कात्रे आभार यांनी मानले. शहर व परिसरातून विविध संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुलताबादच्या नामांतरावर संजय शिरसाट ठाम



**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात औरंगजेबाच्या कबरीवर सुरू झालेला वाद थांबत नाही, तोच आता खुलताबाद शहराचे नामांतर करण्याची मागणी होत आहे. खुलताबादचे नामकरण रत्नपूर करण्यावर आपण ठाम असल्याचे शिंदे गटाचे आमदार आणि मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. खुलताबादचे पूर्वीचे नाव रत्नपूरच होते. शासकीय रेकॉर्डवर तशी नोंद असल्याचा दावा संजय शिरसाट यांनी केला आहे. मुस्लिम शासकांनी बदललेले नाव पुन्हा दुरुस्त करायचे आहे. त्यासाठी मी या संदर्भात मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असून पत्र देणार असल्याचेही ते म्हणाले.

छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारणाऱ्या औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी महिनाभरापूर्वी हिंदुत्ववादी संघटनांनी केली होती. यासाठी रस्त्यांवर आंदोलनही करण्यात आली. याचदरम्यान या मुद्द्यावरून नागपूरमध्ये मोठा हिंसाचार उसळला होता. हा वाद शांत होत नाही, तोच आता औरंगजेबाची कबर असलेल्या खुलताबाद शहराचे नामांतर करण्याची मागणी समोर आली आहे. भाजपचे विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आमदार संजय केनेकर यांनी याबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्याकडे मागणी केली आहे. या मागणीचा आधार घेत संजय शिरसाट यांनी खुलताबादचे नामकरण करणार असल्याचे म्हटले आहे.

खुलताबादचे नाव याआधी सुद्धा रत्नपूर होते हे रेकॉर्ड वर आहे. इंग्रजांच्या काळापासून नाव रेकॉर्डवर रत्नपूरचा आहे. दौलताबादचे नाव दौलताबाद नाही देवगिरी आहे. त्याला देवगिरी प्रांत म्हटले जायचे. हे नामांतर नाही झालेली चूक दुरुस्त करायची आहे. औरंगजेबाची कबर खोदायचा विषय जेव्हा काढला तेव्हा काही जणांचा त्याचा त्रास झाला. त्यांना त्याचा स्वाभिमान आहे. आम्हाला आमचा स्वाभिमान जागृत करायला नको का? असा सवालही शिरसाटांनी केला.

पुढे बोलताना शिरसाट म्हणाले की, आम्ही नवीन काही मागत नाही आहे. मी मुख्यमंत्र्यांना या सगळ्या संदर्भात पत्र देत आहे आणि तांत्रिकदृष्ट्या विधिमंडळात दोन्ही सभागृहात याला मंजुरी घ्यावी लागेल. मग केंद्राच्या मान्यतेनुसार हे नाव बदलले जाईल.

दरम्यान, देवदर्शनाच्या सगळ्या जमिनी आपल्या मित्रांना, उद्योगपतींना देणार असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून होत आहे. यावरही संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली. कुठल्याही जागेवर सरकारचा डोळा नाही, असे शिरसाट म्हणाले. या जमिनी अदानी अंबानीला देतील असे कधी होईल का? हजार एकर असलेली ही जागा आहे. सहजासहजी कोणाच्या घशात या जागा टाकता येत नाहीत. कॅथलिक चर्चच्या जागा आम्हाला कशाला हव्यात? या जागा सगळे अधिकृतपणे दिसतील. मुस्लिम ख्रिश्चन समाजाची मत आपल्याकडे कशी येतील, हा प्रयत्न या माध्यमातून होतोय. या समाजाला माहिती आहे सरकारने घेतलेली भूमिका योग्य आहे. उबाठा किती बोंबलले तरी काही होणार नाही. उबाठा एकटी पडली आहे. इंडिया आघाडी संपली आहे. उबाठा शेवटच्या घटका मोजत आहे. असा टोलाही संजय शिरसाट यांनी लगावला.

# गृहपाठ न केल्याने चौथीच्या विद्यार्थिनीला अमानुष शिक्षा

**पालघर :** येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या आदिवासी आश्रमशाळेत चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनींना शिक्षिकेने अशी शिक्षा केली, ज्यामुळे चार दिवसापासून विद्यार्थिनी त्रस्त झाली आहे. जवळपास शंभराहून अधिक उठाबशा या विद्यार्थिनीला काढाव्या लागल्या असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे पालकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तसेच या शिक्षिकेवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

वसई येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत येणाऱ्या भाताणे-बेलवाडी इथल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक आदिवासी आश्रमशाळेत चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने गृहपाठ केला नव्हता. त्यामुळे शिक्षिकेने तिला मी वर्गात बोलवत नाही तोपर्यंत उठाबशा काढण्याची शिक्षा दिली. यात विद्यार्थिनीला शंभर पेक्षा जास्त उठाबशा काढाव्या लागल्या असल्याची माहिती विद्यार्थिनीने दिली आहे. या शिक्षेमुळे तीन ते चार विद्यार्थिनींचे पाय सुजले असल्याने त्रास सहन करावा लागत आहे. तसेच चालण्यासही त्यांना त्रास होत असल्याचे समजते.

2 एप्रिल रोजी ही घटना घडली होती. त्याच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थिनी शाळेत आल्यावर त्यांना होणारा त्रास शिक्षकांच्या लक्षात आला व त्यांनी दवाखान्यात या विद्यार्थिनींना नेले. दवाखान्यात उपस्थित असलेले सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील यांनी या विद्यार्थिनींना बघून अधिकची चौकशी केली असता त्यांना घडलेला प्रकार लक्षात आला. त्यानंतर त्यांनी मुलींच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून या प्रकारची माहिती दिली. पालकांनी शिक्षकांना संपर्क केला असता त्यांना नीट उत्तरे देण्यात आली नाहीत.

शनिवारी पालकांनी थेट शाळा गाठली व मुलींची चौकशी केली. इतरही अनेक मुलींचे पाय सुजले असल्याचे समोर आले. त्यानंतर कुटुंबीयांनी मुलींना घरी आणले असून त्यांच्यावर सध्या स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू केले आहेत. मुलींना चालताही येत नसल्याने पालकांनी काळजी व्यक्त केली आहे. तसेच अमानुष शिक्षा करणाऱ्या शिक्षिकेवर कठोर कारवाई करण्याची मागणी संतप्त पालकांनी केली आहे.